# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०८.०७.२०२५**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (०२.०७.२०२५ ते ०८.०७.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०९.०७.२०२५ ते १३.०७.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | दिनांक | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | १८ | १५ | १० | ९ | १४ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | २७ | २८ | २८ | ३० | २९ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २२ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८७ | ८६ | ८५ | ८५ | ८७ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ७५ | ७४ | ७५ | ७४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२ | १२ | १२ | १३ | १५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू.नै. | पू.नै. | पू.नै. | पू.नै. | पू.नै. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **सातारा जिल्ह्यामध्ये ९ ते १३ जुलै दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे.** सातारा जिल्ह्यामध्ये घाट भागात दिनांक ९ व १० जुलै बऱ्याच ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या तसेच दिनांक ११, १२ व १३ जुलै रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे तसेच जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागात ९ व १० जुलै काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या तसेच दिनांक ११, १२ व १३ जुलै रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवसांत कमाल तापमान २७.० ते ३०.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८५ ते ८७% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ७४ ते ७९% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १२ ते १५ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ९ ते १५ जुलै, २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान तसेच कमाल तापमान सरासरी दरम्यान तर किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान इशारा | | ➢ दिनांक ०८.०७.२०२५ रोजी **सातारा** जिल्ह्यामधील घाट भागात तुरळक ठिकाणी **मुसळधार स्वरुपाच्या** पावसाची शक्यता आहे.<br>➢ दिनांक ०९.०७.२०२५ रोजी **सातारा** जिल्ह्यामधील घाट भागात तुरळक ठिकाणी **मुसळधार स्वरुपाच्या** पावसाची शक्यता आहे.<br>➢ दिनांक १०.०७.२०२५ रोजी **सातारा** जिल्ह्यामधील घाट भागात तुरळक ठिकाणी **मुसळधार स्वरुपाच्या** पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ मेघदूत अॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.aas.meghdoot<br>❖ दामिनी अॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.lightening.live.damini<br>➢ **सातारा जिल्ह्यातील शेतकरी बांधव ज्या ठिकाणी वाफसा आहे त्या ठिकाणी मका, भुईमूग आणि राजमा ई. पिकांची पेरणी करू शकतात** |
| संदेश | | गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो बुरशी लागलेला चारा नष्ट करावा. जनावरांचे खाद्य / खाद्यघटक दमट आर्द्रता युक्त वातावरणात साठवू नयेत. |
| भात | पुनर्लागवड | ➢ ज्या भागामध्ये पुरेसा पाऊस झालेला आहे त्या भागात भात पुनर्लागवड सुरु करता येऊ शकते.<br>➢ हळव्या जातींची पुनर्लागवड पेरणीनंतर २१ ते २५ दिवसांनी, निमगरव्या जातींची २३ ते २६ व गरव्या जातींची २५ ते ३० दिवसांनी करावी. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com


| | | |
|---|---|---|
| | | ➢ रोपांची पुनर्लागवड हळव्या वाणांमध्ये १५ x१५ सें.मी आणि निमगरव्या ,गरव्या आणि संकरीत वाणांमध्ये २० x१५ सें.मी या अंतरावर करावी. |
| मका | पेरणी | ➢ शेतकरी बंधु ज्या ठिकाणी वाफसा आला आहे त्या ठिकाणी १५ जुलै पर्यंत पेरणी करू शकतात<br>➢ **बियाणे प्रमाण:** धाण्यासाठी – पेरणीकरिता एकरी ६ ते ८ किलो बियाणे तर चाऱ्यासाठी मका पेरणीकरिता एकरी ३० किलो बियाणे लागते.<br>➢ **बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी २ ते २ .ग्रॅम थायरम हे बुरशिनाशक प्रती किलो बियाण्यास चोळावे ५.तसेच ॲझोटोबॅक्टर जीवाणू संवर्धन २५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी.<br>➢ ज्या ठिकाणी उगवण झालेली नाही त्या ठिकाणी त्वरित नांग्या भराव्यात. |
| भुईमूग | पेरणी | ➢ शेतकरी बंधु ज्या ठिकाणी वाफसा आला आहे त्या ठिकाणी १५ जुलै पर्यंत पेरणी करू शकतात<br>➢ **बीजप्रक्रीया -** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे<br>**आंतरपिके**<br>➢ खरीप भुईमुग पिकात सोयाबीन, सुर्यफुल, मुग, उडीद व तूर हि आंतरपिके ६ :२ या प्रमाणात घेतल्यास अधिक आर्थिक फायदा होतो.<br>➢ पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी : भुईमुग+सोयाबीन (४:१) आणि कडेने एरंडीची लागवड (दोन ओळी) |
| राजमा | पेरणी | ➢ पुरेसा पाऊस झाला असल्यास जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागामध्ये शेतकरी बांधव (कराड, कोरेगाव, वाई, खंडाळा, खटाव) पेरणी करून शकतात<br>➢ बीजप्रक्रिया: २५० ग्रॅम रायझोबियम व २५० ग्रॅम पीएसबी जिवाणूसंवर्धन १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावनातून बीजप्रक्रिया करावी<br>➢ खते: राजमा पेरणी करताना ३० किलो नत्र आणि ८० किलो स्फुरद या प्रमाणे रसायनिक खताची मात्र द्यावी |
| बटाटा | लागवड | ➢ कराड, कोरेगाव, वाई, खंडाळा, खटाव या तालुक्यांमध्ये बटाटा लागवड जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरावड्या पर्यंत पूर्ण करावी<br>➢ **लागवडीसाठी खालील वाणांची निवड करावी**<br>कुफरी, ज्योती, कुफरी लवकर, कुफरी सिंदूरी, कुफरी सूर्या, कुफरी पुखराज<br>➢ **बीजप्रक्रिया:** २.५ किलो ॲझोटोबॅक्टर आणि ५०० मिली द्रवरूप ॲसिटोबॅक्टर प्रती १०० लिटर पाण्यात २० क्विंटल बियाणे ३० मिनिटे बेणे प्रक्रिया करावी<br>➢ **रसायनिक खते :** लागवडीपूर्वी १००:६०:१२० किलो नत्रःस्फुरदः पालाश प्रति हेक्टरी म्हणजेच लागवडीच्या वेळी युरिया खताच्या ०५ बॅगा, सिंगल सुपर फॉस्फेटच्या ७.५ बॅग तसेच म्युरेट ऑफ पोटॅश या खताच्या ४ बॅग ही मात्रा प्रति हेक्टरी द्यावी. लागवडीच्या वेळी २० किलो झिंक सल्फेट प्रति हेक्टर शेणखतात मिसळून द्यावे. |
| कुळीथ | पेरणी | ➢ जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागामध्ये वाफसा असताना पेरणी पूर्ण करावी<br>➢ पेरणीसाठी वाण: सीना, माण, फुले सकस<br>➢ हेक्टरी बियाणे प्रमाणकिलो १५ ते १२ :<br>➢ बीजप्रक्रिया किलो १० ग्रॅम रायझोबियम व पीएसबी जीवाणूसंवर्धन २५० प्रत्येकी :बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे |
| मटकी | पेरणी | ➢ जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागामध्ये वाफसा असताना पेरणी पूर्ण करावी<br>➢ पेरणीसाठी वाण: एमबीएस २७, फुले सरिता<br>➢ हेक्टरी बियाणे प्रमाणकिलो १५ ते १२ :<br>➢ बीजप्रक्रिया: प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पीएसबी जीवाणूसंवर्धन १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे |
| डाळिंब | मृग बहार वाढीची | ➢ पिवळे/ निळे रंगाचे चिकट सापळे एकरी २४ या प्रमाणात बागेत नागमोडी पद्धतीने लावावेत. चिकट सापळे झाडाच्या उंचीच्या वरील भागापासून १५ सें.मी. खाली लावावेत/ लटकवावेत. |
| ऊस | वाढीची | ➢ १५ जुलै नंतर आडसाली ऊस लागवड करण्यासाठी आवश्यक पूर्वमशागत रानबांधणी आखणी पूर्ण करून घ्यावी.<br>➢ मध्यम जमिनीत एक मीटर अंतरावर तर भारी जमिनीत १.२० मीटर अंतरावर सरी उताराच्या आडवी सोडावी.<br>➢ सरी सोडण्यापूर्वी प्रति हेक्टरी ३० टन (६० बैलगाड्या) चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट वापरावे.<br>➢ शेतकरी बंधू आडसाली ऊस लागवड १५ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधी दरम्यान करू शकतात.<br>➢ आडसाली लागण करण्यासाठी को ८६०३२, फुले ०२६५ व फुले ऊस १५०१२ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांची जमिनीच्या मगदूरानुसार उपलब्धता करून घ्यावी. |
| पशुधन | वाढीची | ➢ गायी म्हशी नुकत्याच प्रसव झाल्या असल्यास नवजात वासरांची विशेष दक्षता घ्यावी.<br>➢ नवजात वासरांना कोरड्या जागेवर, उबदार वातावरणात ठेवावे. वासरांना त्याच्या वजनाच्या १० टक्के इतका चीक दिवसातून ३ ते ४ वेळा विभागुन तीन दिवस द्यावा. त्यामुळे त्यांच्यामध्ये रोगप्रतिकारशक्ती वाढेल.<br>➢ संपूर्ण पावसाळयात स्तनदाहाचे प्रमाण वाढते. त्यासाठी दुध काढण्यापूर्वी व काढल्यानंतर जीवाणूनाशक द्रावणाची कासेवर फवारणी |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | करावी किंवा सडे द्रावणात बुडवावीत. |

| | |
|---|---|
| मेघदूत अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०८.०७.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**